

# महिला विकास कक्ष

## मुंबई विद्यापीठ

# ‘आंतरराष्ट्रीय महिला दिन’

### महिला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी स्नेहमेळावा

शनिवार दि. ७ मार्च २०१५

प्रमुख पाहुण्या

## प्रा. (डॉ.) माया पंडित

## अध्यक्ष : मा. (प्रभारी) कुलगुरू डॉ. नरेश चंद्र

स्थळ : कवीवर्य कुसूमाग्रज, मराठी भाषा भवन, विद्यानगरी कालिना,

सांताक्रुझ, मुंबई - ४०००९८

वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५

# महिला विकास कक्ष
# मुंबई विद्यापीठ

## आंतरराष्ट्रीय महिला दिन – ७ मार्च २०१५

मैत्रीणींनो,

दरवर्षीप्रमाणे यावर्षीचा आंतरराष्ट्रीय महिला दिन आपण शनिवार ता. ७ मार्च २०१५ रोजी साजरा करीत आहोत. गेल्या वर्षी आपण डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या निर्घृण खूनाच्या पार्श्वभूमीवर ‘ स्त्रिया आणि अंधश्रध्दा ’ या विषयावर कार्यक्रम करून त्यांना आदरांजली वाहिली. आज कॉ. गोविंद पानसरे यांच्यासारख्या विचारवंत व सामाजिक–राजकीय चळवळीतील अग्रणी नेत्याच्या भीषण खूनामुळे संवेदनशील समाजमन सुन्न झाले आहे. मागास जाती–वर्गाच्या शोषणाविरोधी प्रत्येक चळवळीत कॉ. गोविंद पानसरे यांचा सहभाग होता. तसेच स्त्रियांवरील अन्यायाच्या विरोधात ते सातत्याने लढले. शिवाजी महाराजांचे ‘रयतेचा राजा’ हे खरे स्वरूप त्यांनी महाराष्ट्राला समजावून दिले आणि त्यांना मुस्लिम विरोधी ठरवणा–यांना खोट्यात पाडले. परंतु सत्य ज्यांना पचवता येत नाही किंवा ते ज्यांच्या हिताच्या आड येते, ते वैचारिक चर्चेऐवजी माणसाला संपवण्याचा मार्ग पसंत करतात.

अर्थात माणूस मारल्याने विचार संपत नाही. विचारांचा विरोध विचारानेच होतो. तसेच अविचाराचा विरोधही विचारानेच होतो. म्हणूनच आपल्याला विचार समजून घ्यावा लागतो. विचार समजून घेण्याचे आणि चर्चा करून संवाद करण्याचे स्वातंत्र्य लोकशहीतच असते. याउलट हिंसाचार सुरू झाला की लोकशाही संपते. एकदा हिंसाचार सुरू झाला की अंतिमतः त्यात स्त्रिया आणि मुले भरडली जाणार हे जगाच्या इतिहासातील महत्वाचे सत्य आहे.

या वास्तवाच्या संदर्भात या वर्षीच्या कार्यक्रमाची आखणी केली आहे.

**पहिले सत्रः** विषय देऊन गटवार चर्चा व मांडणी

**दुसरे सत्रः** प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. माया पंडित यांचे मार्गदर्शनपर भाषण

**तिसरे सत्रः** ‘ शिवाजी कोण होता? ’ कॉ. गोविंद पानसरे यांच्या प्रसिध्द भाषणाची चित्रफीत

**चौथे सत्रः** बक्षीस समारंभ

तरी आपल्या महिला विकास कक्षाने आपल्यासाठीच आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा ही विनंती.

**स्थळ :** कविवर्य कुसुमाग्रज मराठी
भाषा भवन,
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी परीसर,
मुंबई – ४०० ०९८.

डॉ. क्रांती जेजुरकर,
कार्याध्यक्ष,
महिला विकास कक्ष,
मुंबई विद्यापीठ

**विशेष सूचना :** कार्यक्रमात सहभागी होणा–यांची नोंदणी १०:०० ते १०:३० या वेळेतच होईल. नंतर प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.